## निशाणी क्र. ७१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२, ३ व ५ ते ७ यांनी त्यांचे विरूध्द दि. १८/०७/२०२५ रोजी झालेला 'उलटतपास नाही' आदेश रदद् होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर प्रतिवादी यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे दि. १८/०७/२०२५ रोजी त्यांचे विरूध्द उलटतपास नाही आदेश पारीत झाला आहे. वास्तविक सदर तारखेस प्रतिवादी यांचे माहितगार वकील सकाळचे सत्रात न्यायालयात हजर होते. मात्र वादी व वादीचे वकील पुकारा केला असता हजर नसल्याने त्यावेळी उलटतपास घेता येणे शक्य झाले नाही. त्यानंतर दुपारचे सत्रात प्रतिवादी यांचे माहितगार वकील नाशिकरोड येथील कौटुंबिक न्यायालयात गेलेले असल्याने त्यांना न्यायालयात हजर राहता येणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांचा उलटतपास न घेण्यामागे काहीएक गैरहेतु नव्हता. प्रस्तुत प्रतिवादी हे वादी यांचा उलटतपास घेण्यास तयार असुन त्याकामी सदरचा आदेश सेट असाईड होणे गरजेचे आहे. तरी सदरील आदेश सेट असाईड केल्यास वादीचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्यास मदत होणार आहे. सबब प्रतिवादीं विरूध्द झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होणेकामी त्यांनी विनंती केलेली आहे.

३. वादीतर्फे विधीज्ञ यांनी प्रस्तुत अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जास आपली तिव्र हरकत नोंदविली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे अर्ज खरा व कायदेशीर नाही. तसेच अर्जात दिलेले कारण संयुक्तिक नाही. त्यांनी असेही कथन केले की, दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे या एकमेव उददेशाने सदरचा अर्ज दिला आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्ज, त्यावरील खुलासा आणि अभिलेखाचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी यांच्याविरुध्द दिनांक १८/०७/२०२५ रोजी उलटतपास नाही आदेश करण्यात आलेला आहे. त्या दिवशी पहिल्या सत्रात सदर प्रतिवादींच सुविद्य विधीज्ञांचे सहायक विधीज्ञ पहिल्या सत्रात एकदा हजर झाले. त्यानंतर लगेच १२ वाजेपुर्वी वादी व त्यांचे विधीज्ञ हजर झाले. प्रतिवादी व त्यांच्या विधीज्ञांचा वेळोवेळी पुकारा केला परंतु ते हजर झाले नाहीत. म्हणुन प्रकरण दुपारचे सत्रात ठेवले. दुपारच्या सत्रातही सदर प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञांचा पुकारा केला असता कोणीही हजर राहीलेले नाही. साक्षीदार हे सकाळपासुन हजर होते. प्रतिवादींतर्फे कोणताही अर्ज नव्हता म्हणुन त्यांचे विरूध्द उलटतपास नाही आदेश पारीत करण्यात आला. सदर आदेश पारीत झाल्यानंतर प्रतिवादींचे सहायक विधीज्ञ पुन्हा सायंकाळी हजर झाले. परंतु त्याच दिवशी सदर प्रतिवादींतर्फे अर्ज दाखल झाला नाही. त्यानंतर पुढील तारखेला प्रस्तुत अर्ज दाखल झाला.

५. पक्षकारांचे वकील इतर न्यायालयात व्यस्त हे कारण मुदतीसाठी नाही. तथापी उपरोक्त नमुद केलेले त्या दिवसाची घडामोड पाहता व आजही दावा पुढील साक्षीदाराकरीता आहे. दावा केव्हाही गुणवत्तेवर चालविणे योग्य आहे. प्रतिवादीच्या गैरहजेरीमध्ये झालेला विलंब खर्चाचा आदेश करून भरून काढता येवु शकतो. म्हणुन न्यायाच्या दृष्टीने एक शेवटीची संधी म्हणुन प्रस्तुत अर्ज मंजुर करून प्रतिवादींना एक संधी देणे योग्य व संयुक्तिक ठरते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.२, ३, ५ ते ७ यांचा प्रस्तुत अर्ज रक्कम रु. ५००/— (रुपये पाचशे मात्र) खर्च वादींना देणेचे अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. २, ३, ५ ते ७ यांचे विरूध्द दिनांक १८/०७/२०२५ रोजी पारित करण्यात आलेला ‘उलटतपास नाही’ हा आदेश रदद्

करण्यात येवुन साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घ
ोण्याची संधी सदर प्रतिवादींना देण्यात येते.

३. सदर प्रतिवादींनी पुढील तारखेला सदर साक्षीदाराची साक्ष घ्यावयाची आहे अन्यथा सदर आदेश आपोआप रदद झाला असे गृहीत धरून उलटतपास नाही हा आदेश कायम करण्यात येईल.

**(के. एच. पाटील)**

**दि. १३/०८/२०२५. ५वे सह—दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), नाशिक.**